162

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

सहा.पोलीस निरीक्षक कार्यालय पो.स्टे.वसमत (ग्रा.)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** हिंगोली **P.S.(ठाणे):** बसमत ग्रामिण पोलीस स्टेशन **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0068 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/05/2022 05:19 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 11/05/2022
   **Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/05/2022
   **Time From (वेळेपासून):** 12:38 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:38 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 12/05/2022 **Time (वेळ):** 04:55 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 006 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/05/2022 04:55 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 10 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** अकोली

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** बालासाहेब शंकरराव कदम

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आकोली ,वसमत ,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आकोली ,वसमत ,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शेख समीर शेख खैसर | | | 1. विजयनगर पुर्णा ,पुर्णा ,परभणी,महाराष्ट्र, भारत |
| 2 | करीम कुरेशी शादुल्ला | | | 1. अजीज नगर पुर्णा ,पुर्णा ,परभणी, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्कुवेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 12/05/2022फिर्यादमी बालासाहेब शंकरराव कदम, वय 40 वर्ष, व्यवसाय - शेती, रा. आकोली ता. वसमत जि. हिंगोली मो. नं 9370485221.समक्ष पोलीस स्टेशन वसमत येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन मी दिनांक 28/12/2021 रोजी पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांचे कार्यालयात जावून तक्रार दिली होती की, माझे गावातील प्लॉटवर पंतप्रधान आवास योजने अंतर्गत 1,20,000/- रू प्रमाणे मंजुर झाले आहेत त्यापैकी पहिला हप्ता 15000/- रू व दुसरा हप्ता 45000/- रू असे एकुण 60,000/- माझे स्टेट बंक ऑफ इंडिया खत्यावर जमा झाले आहे. उर्वरित रक्कम जमा करणेसाठी पंचायत समिती वसमत येथील इंजिनियर समीर हे 10,000/- रू लाच मागत असल्याबाबत तक्रार दिली होती. सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 29/12/2021 रोजी पोनि श्री पखाले यांनी दोन शासकीय पंचासह वसमत शहरापासुन काही अंतरावर असलेल्या शिवपुरी गावाजवळ येथे आले. त्यानंतर तिथे माझी, पंचाची व सर्व सापळा पथकाची एकमेकांना ओळख करुन दिली. त्यानंतर दोन्ही पंचानी माझे तक्रारीबाबत खात्री केली व व्हाईस रेकॉर्डरमध्ये वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर पोनि पखाले व सापळा पथकातील सदस्य व पंच असे वसमत शहरामध्ये जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर सुरक्षित ठिकाणी आलोत तेथे माझेकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर देवून माझेसह पंच क्र-1 पांचाळ यांना पंचायत समिती कार्यालय वसमत येथे इंजिनियर समीर याची भेट घेण्यासाठी पाठविले परंतु इंजिनियर समीर यांची कार्यालयात भेट झाली नाही. मी व पंच असे परत पोनि श्री पखाले यांचेकडे परत जावून सर्व हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि पखाले यांचे सुचनेवरून मी माझे मोबाईलवरून इंजिनियर समीर यांचे मोबाईलवर फोन लावला तेव्हा इंजिनियर समीर हे नाष्टा करण्यासाठी बाहेर गेल्याचे व 10 मिनीट लागतात असे सांगितले. त्यानंतर परत काहीवेळाने माझेकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर देवून माझेसह पंच क्र-1 पांचाळ यांना पंचायत समिती कार्यालय वसमत येथे इंजिनियर समीर यांची भेट घेण्यासाठी पाठविले त्यावेळी देखील इंजिनियर समीर हे कार्यालयात भेटले नाही आम्ही परत पोनि श्री पखाले साहेब यांचेकडे परत येवून सर्व हकीकत सांगितली. त्यानंतर माझे मोबाईलवरून इंजिनियर समीर यांना फोन केला तेव्हा इंजिनियर समीर यांनी मला लकी हॉटेलजवळ येण्यास सांगितले. पोनि श्री पखाले साहेब यांनी माझेकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर देवून माझेसोबत पंच क्र-1 पांचाळ यांना लकी हॉटेलजवळ पाठविले आम्ही लकी हॉटेजवळ गेलो तेथे इंजिनियर समीर हे दिसले नाही मी त्यांचा आजुबाजुला व पंचायत समिती कार्यालयात शोध घेतला ते मला कोठेही दिसले नाही. मी व पंच असे लकी हॉटेलजवळ इंजिनियर समीर यांची वाट पाहत थांबलो काही वेळाने माझे मोबाईलवर फोन आला समोरील व्यक्तीला हॉटेल लकी समोर आहे याबाबत माहीती देत होते. त्याचवेळी एका मोटारसायकलवर अंदाजे 20 ते 25 वयोगटाचे दोन इसम आले. त्यापैकी मोटारसायकल चालविण्या-या एका मुलाने मला, कागदपत्र आणले काय? ,अकोलीचे का तुम्ही? अशी विचारणा केली असता मी

त्यांनी कागदपत्र आणले नाहीत असे सांगीतले. त्यानंतर त्या मुलाने इंजिनियर समीर यांना कॉल केला व मला बोलण्यास मोबाईल दिला. इंजिनियर समीर ने मामा, मी इंजीनिअर बालायलो,भैयाकडे देवून टाका ना, तुमंच करून टाकतो काम असे म्हणाले असता मी त्यांना भैयाची ओळख नाही,म्या कधीच पाहीला नाही भैयाला,तेव्हा इंजिनियर समीर यांनी तुमच्या मुलाला सांगीतल व्हतं ना मी असे म्हणाले असता मी पोराला म्हंणले व्हते मातर काही नाही असे त्यावेळी इंजिनिअर यांनी आपले माणुस आला.त्यांना देवून टाकाना तुम्ही असे म्हणाले असता मी नाही बा आपल्याला भरोसा नाही.एकदा असाच धोका झाला.मला त्यांची ओळख नाही.मोबाईलच कळत नाही. त्यावर इंजिनिअर यांनी नाही नाही तस नाही होणार,देवून टाका ना मग, कशाला टेन्शन घ्यायले मी सांगायलो ना तुम्हाला असे म्हणाले. त्यावर मी त्यांना, हो बोलालो बाबा असाच झाला मला.त्या माणसांन पैसे घेवून गेला महयापासून असे म्हणालो त्यानंतर मोटार सायकलवर आलेल्या मुलाने एक काम करा मामा, उदया या तुम्ही असे म्हणून सदर ठिकाणावरून निघून गेलेत.त्यानंतर मी व पंच असे पोनि श्री पखाले साहेब यांचेजवळ परत जावून सर्व हकीकत सांगितली तेव्हा पोनि श्री पखाले यांनी दिनांक 30/12/2021 रोजी कार्यवाही करण्याचा निर्णय घेवून मला घरी जाण्याची परवानगी दिली व पोनि श्री पखाले व सर्व सापळा पथक असे नांदेडकडे निघुन गेले.त्यानंतर दिनांक 30/12/2021 रोजी सकाळी पोनि श्री पखाले साहेब, दोन्ही पंच व सर्व सापळा पथक असे वसमत शहरापासुन काही अंतरावर असलेल्या शिवपुरी गावाजवळ आले मी त्यांचे सुचनेप्रमाणे पुर्वीच सदर ठिकाणी हजर होतो. तेथुन पोनि पखाले व सापळा पथकातील सदस्य व पंच असे वसमत शहरामध्ये जिल्हा परिषद मैदानावर सुरक्षित ठिकाणी आलोत तेथे पोनि श्री पखाले यांनी सर्वांना लाच मागणीच्या अनुशंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर माझेकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर देवून माझेसोबत पंच क्र-1 पांचाळ यांना पंचायत समिती कार्यालय वसमत येथे इंजिनियर समीर यांची भेट घेण्यासाठी पाठविले. मी व पंच असे पंचायत समिती वसमत कार्यालयात गेलो तेथे इंजिनियर समीर हजर नव्हते त्यांना माझे मोबाईलवरून फोन केला असता फोन बंद येत होता मी व पंच असे तेथेच थांबलो त्यानंतर इंजिनियर समीर यांचा सहकारी मित्र करीम असे भेटले श्री करीम हे देखील इतर गावचे इंजिनियर असुन ते घरकुलाचे काम पाहतात त्यांनी मी इंजिनियर समीर बाबत विचारणा केले त्यांनी मला अकोली गावचे का? अशी विचारणा केली मी त्यांना हो म्हणुन माझे घरकुलाच्या बीलाबाबत सांगितले तेव्हा त्यांनी मामा याचं आणि तुमच काही नाही ते ग्रामसेवकाच त्यांच जमत नाही त्यामध्ये तुम्ही अडकुन बसलेत असे म्हणाला तेव्हा मी हो त्यांना बोलल्यावर कळेल ना, मी शेतकरी ओ रोज यायला नाही परवडणार असे म्हणालो तेव्हा इंजिनियर करीम यांनी मामा तुंम्ही काही त्यांन ठरवलं होत की नाही. ते ओमलवार इंजिनिअरच्या समोर तुंम्ही काय ठरवले होते पैसे बीसे ठरवले होते ते तेवढं बाकी ते इंजिनिअरकडे देवुन टाकायचं काम करून टाकायचं. असे म्हणुन मला इंजिनियर समीर यांना लाच देण्यास प्रोत्साहन दिले. त्यानंतर इंजिनियर श्री करीम यांचेकडुन मला समजले की इंजिनियर समीर हे परभणी येथे गेले आहे. त्यानंतर माझे विनंतीवरून इंजिनियर करीम यांनी त्यांचे फोनवरून इंजिनियर समीर यांना फोन लावून फोन माझेकडे दिला मी समीर यांना घरकुलाचे बिलाबाबत बोललो तेव्हा इंजिनियर समीर यांनी मला उद्या येतो तुमच्या गावाकडं असे म्हणाले तेव्हा मी व पंच असे दोघे पोनि श्री पखाले यांचेकडे येवून सर्व हकीकत सांगितली. त्यावेळी पोनि श्री पखाले साहेब यांनी दिनांक 31/12/2022 रोजी अकोली गावात लाचमागणी करण्याचा निर्णय घेवून मला घरी जाण्याची परवानगी दिली व पोनि श्री पखाले व सर्व सापळा पथक असे नांदेडकडे निघुन गेले. दिनांक 31/12/2021 रोजी सकाळी पोनि श्री राहुल पखाले , दोन्ही पंच व सर्व सापळा पथक असे सती पांगरी फाटाजवळ आले मी त्यांचे सुचनेनुसार पुर्वीच येवून थांबलो होतो. मी पोनि श्री पखाले साहेब यांना काहीवेळापुर्वी इंजिनियर समीर यांचा फोन आला व तो गावात येत असुन मला घरी थांबण्यास सांगितला आहे असे सांगितले तेव्हा पोनि श्री पखाले साहेब यांनी अकोली गावामध्ये माझे घरामध्ये लाचमागणी पडताळणी कार्यवाहीचा निर्णय घेवून सर्वांना लाचमागणीच्या आवश्यक त्या सुचना दिल्या. पोनि श्री पखाले यांचे सुचनेवरून सापळा पथकातील पोना तालकोकुलवार व पंच क्र-1 व मी असे माझे अकोली गावात माझे घरी गेलोत पोना तालकोकुलवार व पंच क्र-1 व मी असे माझे घराचे छतावर सुरक्षित बसलेत त्यानंतर काहीवेळाने माझा मुलगा हा गच्चीवर आला व इंजिनियर समीर व त्याचेसोबत एक मुलगा खाली घरामध्ये आल्याचे सांगितले त्याचवेळी पोना तालकोकुलवा यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर माझे गळयात अडकावून माझेसह पंच क्र-1 पांचाळ यांना खाली घरामध्ये पाठविले तेथे इंजिनियर समीर व इंजिनियर करीम असे दोघे माझे घराचे बैठक खोलीमध्ये बसलेले होते मी इंजिनियर समीर यांना माझे घरकुलाचे कामाबाबत बोललो तेव्हा त्यांनी मला मागे मी तुम्हाला सागलं बोलल तुम्हाला, तुमच्या मुलाला सांगितल होतं असे म्हणुन तुमच्या आकारनं जसं करायचं ते तुम्ही करा असे, काय आहे ते देवुन टाका कमी जास्त करून असे म्हणाले.तेव्हा मी इंजीनिअर समीर यांना सात हजार देवुन टाकुत पहिले हं असे म्हणालो तेव्हा इंजीनिअर समीर यांनी करा तुमच्या आकाराने असे म्हणाले. तेव्हा मी मंग उदया भेटू का नको? अशी विचारणा केली तेव्हा इंजीनिअर समीर यांनी सोमवारी फोन लावुन या मामा, अंभोरे साहेबांन बोलुन काहीतरी करूत असे म्हणाले. सदरचे बोलणे झाले नंतर इंजीनिअर समीर व त्यांचे सहकारी असे मोटारसायकलवरुन माझे घरून निघून गेले. त्यांनतर मी व पंच, पोना तालकोकुलवार असे आकोली गावातून निघून सापळा पथक थांबल्याच्या ठिकाणी परत आलोत व पोनि श्री पखाले साहेबांना सर्व हकीकत सांगितली. इंजिनियर समीर यांनी मला लाचेची मागणी करून 7000/- लाच स्विकारण्यास सहमती दिली त्यावेळी पोनि श्री राहुल पखाले साहेबांनी सोमवारी दिनांक 03/01/2022 रोजी सोमवारी इंजिनियर समीर यांचेवर सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला व मला दिनांक 03/01/2022 रोजी पंचायत समिती कार्यालय वसमत येथे येण्याच्या सुचना देवून पोनि श्री पखाले साहेब, दोन्ही पंच व सर्व सापळा पथक असे नांदेडकडे निघुन गेले.त्यानंतर दिनांक 03/01/2022 रोजी सकाळी पोनि श्री पखाले, दोन्ही पंच व सर्व सापळा पथक असे वसमत शहरातील जिल्हा परिषद मैदानावर आले. मी पुर्वीच सदर ठिकाणी येवून थांबलो होतो. पोनि पखाले यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतली व माझेकडुन 7000/- रू ज्यात 500/- रू दराच्या 14 नोटा होत्या सदर रक्कम सापळा कार्यवाहीकामी घेतले. त्यानंतर पोनि श्री पखाले यांचे सुचनेवरून मला अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लम्प व अँन्थ्राँसीन पावडर चे प्रात्यक्षिक दाखविले.त्यानंतर 7000/- रु ,500/- रु दराच्या चलनी नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदर नोटा माझे पन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर सर्वांना सापळा कार्यवाहीच्या अनुशंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या व मला लाच स्विकृती झाल्यानंतर गळयातील मोठी दस्ती काढुण हातात धरून लाच स्विकारल्याचा इशारा करावा अशा सुचना दिल्या. त्यानंतर माझे मोबाईल क्रमांकावरून इंजिनियर समीर यांचे मोबाईलवर कॉल करून इंजिनियर समीर यांना आउ क्या? असे विचारले असता इंजिनियर समीर यांनी मै तुम्हारे गाव की तरफ है एक घंटा लगता, फोन लगाता आये बाद असे म्हणाले त्यानंतर दुपारी 2 वाजण्याच्या सुमारास इंजिनियर समीर यांचा माझे मोबाईलवर कॉल आला तेव्हा इंजिनियर समीर यांनी मामा किधर है? अशी विचारणा केली. तेव्हा मी त्यांना वसमतला चौकात आहे सांगुन येवू का? अशी विचारणा केली तेव्हा इंजिनियर समीर यांनी हो असे म्हणाले व फोन कट केला. त्यावेळी पोनि श्री पखाले साहेबांनी माझेकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर देवून माझेसह पंच क्रमांक-1 पांचाळ यांना पंचायत समिती वसमत येथे पाठविले आमचे पाठोपाठ सर्व सापळा पथक असे पंचायत समिती कार्यालयाच्या परिसरात आले तेव्हा मी इंजिनियर समीर यांची भेट घेतली तेव्हा इंजिनियर समीर यांनी मामा काय बोलत होते बोला? असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना घरकुलाच्या हप्त्याबाबत बोललो तेव्हा मी आपले पहिले पैसे भेटले आता राहीलेले कधी करता सोमवारी या म्हटले., साहेबाना एकदा बोला आपण एकदा पंचनामा झाला की करून टाकुत तुमचे काम असलेले तेव्हा इंजिनियर समीर यांनी तुम्हीच बोला ते काय बोलायचे ते असे म्हणाले. त्यानंतर मी तुम्हाला म्हटलो मी चिल्लर काही तेव्हा इंजिनियर समीर तुम्हाला जे म्हटलो ना मी तेवढ फायनल आहे, जसे तुम्हाला तुमच्या कडुन काही पाहिजे असले तर असे म्हणाले तेव्हा मी त्यांना तेवढयात कमी होतच नाही? अशी

विचारणा केली तेव्हा इंजिनियर समीर यांनी मामा तुमलाच सागा( सोबत परीपुर्ण फिर्याद जोडली आहे)

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the Investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): NILESH DEVIDAS SURADKAR
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) ( PI पवार ACB हिंगोली)
**No.(क्र.):** 15101000402NDS **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Vilas sudhamrao Chauli
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): CPF15101000402VSCM8801X

ASI
ठाणे अमलदार
पो.स्टे.वसमत ग्रामीण जि.हिंगोली.